पांढरे फटक पडले ते भीतीने
[illegible]
अंशतः स्त्री, अंशतः गाय असा अद्‌भुत प्राणी.
आणि झाले अवाक् ते सगळे.
आणि नंतर – नंतर कोणी केले तिचे सांत्वन ?
[illegible]
– गोलचकरा मारीत माशीने दंशिलेल्या त्या
वेदनापीडित आयोची ?

अमर्याद एकछत्री सत्ता गाजवणाऱ्या झ्यूसला आली करुणा
वत्सल सामर्थ्याने झ्यूसने तिच्यावर सोडला देवांश श्वास
आणि मिळवून दिले तिला विश्रांतिसुख,
मग गाळले तिने अश्रू विश्रांती अनुभवीत
आणि दिली वाट करून अवघ्या दुःखांना, अपमानांना.
ग्रहण केले तिने स्वशरीरात
झ्यूसचे वीर्य – अणू बहुमोल मात्र गुणी गरुडतायरना
(किती बोल इतिहास!) जाणी दिल्ल कन्या एका [illegible]

त्या तिच्या मुलाला प्राप्त झाले दीर्घायुष्य
आणि सर्व तऱ्हेची समृद्धी.
[illegible]
–'तिरेसियास' होते ती व्यक्ती त्याचे नाव,
कारण हीराच्या फटाग्रुळे जखमेले पिसे
कोण नष्ट करू शकले असते झ्यूसशिवाय ?
झ्यूसच्या हस्तातच आहे सामर्थ्य या रोगनिवारणाचे.
हे मूल आहे झ्यूसचे बीज –
एवढे म्हणा म्हणजे सत्याप्रत पोचेल तुमचा अंदाज.'

[illegible]
असावा?
त्यासाठी कोणत्या देवाचा धावा करणे होईल उचित ?
देवाच्या राजा, तू आहेस आमचा पिता.
तुझ्याच हातांनी लाधलास तू आमचा वंशवृक्ष.
करू दे याची आठवण तुझे अंतःकरण आता.
हे थोर निर्मात्या सुखदात्या,
परमश्रेष्ठ पुण्यश्लोक देवा !
स्वसिंहासनस्थ असा तू मानीत नाहीस
कोणाही वरिष्ठांची आज्ञा.
तू नाहीच आहेस कनिष्ठ श्रेणीचा सत्ताधारी
नियुक्त केलेला कोणा राजाधिराजाने.

तू झुकता नाहीस तुझ्याहून उच्चपदावर असलेल्या
कोणाच्या लहरीपुढे.
आपल्या मनोगतीतले सारे काही ऐतू
तू त्वरित पालतोस जन्माला
आणि करतोस कृतार्थ स्वसामर्थ्याने.
तू कोणतीही गोष्ट उच्चारायचाच अवकाश –
तत्क्षणीच येते तिला मूर्तस्वरूप.
(पुन्हा डेंनअस प्रवेश करतो.)

डेंनअस : आनंदाची वार्ता, माझ्या मुलींनो !
आरगॉसच्या भरगच्च सभेत घेतले गेले आहेत
आम्हाला अनुकूल असे ठाम निर्णय.

पहिला नागरिकवृंद: तात, स्वागत असो तुमचे,
कोठलाही दूत इतका प्रिय वाटला नव्हता कधीही आम्हाला!
आधी एक गोष्ट सांगा आम्हाला-
काय म्हणतो आहे त्यांचा निर्णय ?
मताधिक्याने दिला गेला आहे आपल्या कृतीस काय ?

डेंनअस : आरगॉसच्या नागरिकांनी निश्चित केले आहे
अगदी वाद घातल्याशिवाय अगदी स्पष्टपणे
एकमताने ठरवले आहे.
त्यामुळे पुन्हा तरुण झाले आहे माझे वृद्ध हृदय.
काय सांगू दाटी झाली होती वातावरणात
अगदी सगळ्या नगरीतील उजव्या हातांची.
त्यांनी घेतला तो निर्णय असा–
आम्ही राहायचे आहे, आरगॉसमधे
स्वायत्त, निर्बाधित असे नागरिक म्हणून;
वचन दिले आहे त्यांनी आम्हाला
मानवी द्वेषापासून सुरक्षित ठेवण्याचे.
हात लावणार नाही आम्हाला

आरगोसच्या अथवा अन्यत्राही विदेशाचा नागरिक,
आमच्याविरुद्ध आमच्या शत्रूंनी जर केला बळाचा वापर
आणि नागरिक अमूनही जर खुषी झाला नाही पुढे
मदत करायला आम्हाला,
तर तो गमावून बसेल नागरिकत्वाचे हक्क आणि
होईल हद्दपार.
[illegible] बजावले त्याने आपल्या प्रजाजनांना–
पाहुणे आणि नागरिक या नात्यांनी
त्यांचा आहे दुहेरी हक्क आपल्यावर.
जर आपण अव्हेरले यांना
तर उठेल आपणास भेडवण्यास
दुहेरी पापोद्भव कलंक
विनाशापेक्षा ताव मारणाऱ्या शवाच्या विशाच्यासारखा.'
या [illegible] हात उंचावून घेतला निर्णय मी यथा सांगितला तसा.
वक्तृत्वकलेतील सारे चतुर आरक्षये
आणि मन जिंकण्याच्या खुबा वापरल्या राजाने
अशी केली दशरथी अहेर स्मृतीदेवाने या प्रकरणाची.

पहिला नागरिकवृंद : या,या, आपण करू या प्रार्थना आता
आरगोसच्या नागरिकांसाठी;
आमच्यावर त्यांनी केलेल्या उपकारांची
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

स्वर्गात जन्म घेतलेल्या देवांनो, ऐका माझा आक्रोश आता,
प्रार्थनांची अर्घ्ये मी अर्पिते आहे तुम्हाला,
उठू देऊ नका कधीही भक्षक अग्निज्वाला
या पेलॅसिअनांच्या नगरीत.
कापून नेतो जो इतरांनी पेरलेले मानवी शेत
त्या युद्धपिपासू एरीजला इथे करु देऊ नका
भेसूर गोंगाट.
कारण आमची दया येऊन आरगॉसच्या नागरिकांनी दिली आहे मते
आम्हाला अनुकूल अशी.
करतात ते आदर झ्यूसला शरण गेलेल्या जनांचा –
आमच्या या दुःखी, दयनीय चमूचा.
नाही दिली त्यांनी साथ आपल्या मतप्रदर्शनात
स्त्रियांची इप्सिते लाथाडणाऱ्या पुरुषांना.
त्यांनी जाणीव ठेवली झ्यूसच्या क्रोधाची –
जो शांत होतो सूड उगवूनच,
ज्याच्याशी झुंज घेऊ शकत नाही कुणीही,
संकटाचा भार घेऊन भेटीस येणाऱ्या,
छपराला अमंगळ करणाऱ्या
अशुभसूचक पक्ष्यासारख्या
तो कुठल्याही कुटुंबाला नकोसाच वाटतो.
आरगॉसचे नागरिक मान ठेवतात रक्ताच्या बंधनाचा
आणि झ्यूसच्या पवित्र मंदिरातील शरणार्थ्यांचा.
म्हणूनच राहतील त्यांची स्पंडिले निर्मळ
आणि मंदिरातील देव आनंदाने स्वीकारतील आहुती.
हवा पल्लवसंभारांनी पवित्र झालेल्या माझ्या ओठांतून
त्वरित उच्चारली जावो तळमळीची प्रार्थना.
भयानक, भेसूर न येवो घडी आरगॉसच्या नागरिकांचे.
न होवो आरगॉसची भूमी कलंकित
यादवी युद्धात तिच्या नागरिकांनी एकमेकांचे रक्त सांडून.
या भूमीच्या तरुणांचे यौवनपुष्प
फुलत राहो, खुडले न जाता.

शरणार्थी

अ‍ॅफ्रोडायटीचा प्रियकर मानवसंहारक एरीज[४८]
त्यांच्या यौवनाचा ऐन बहर संपुष्टात न आणो.

मंत्रणासभेतील वृद्धांची आसने शोभविली आहेत.
लांब दाढी वक्षावर रुळत असलेल्या वंद्य वृद्धांकडून;
आणि मग सुव्यवस्थित चालो त्यांची राज्यमंत्रणा
जोवर ते योग्य मान राखतील ग्लूसचा–
जो आहे विशेषकरून परकीय अभ्यागतांचा स्वागी आणि
जो करतो सत्पक्ष प्रस्थापित
अतिप्राचीन न्याय नियमान्वये

करतो आम्ही प्रार्थना
मुलीला होवून भुलोनी जिच्या [illegible]
नवप्रसवांवर शरसंधान करणारी[४९] आर्टेमिस
कृपा करो प्रसूतिसमयी त्यांच्या स्त्रियांवर.

अश्रूंचा जनक असलेल्या एरीजच्या हातात
तरवार देण्यासाठी,
याकरी युद्धाच्या कोलाहलाने
नृत्य आणि संगीत यांना हुसकावून लावण्यासाठी,
आणि ह्या नगरीचे रक्षक तोडण्यासाठी
कधीही झगडे न फिरकोत हिंसा, लुटालूट या आधी
[illegible]
[illegible]
[illegible]
गाडी त्यांच्या माथ्या तरवार.

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

कुरणांमधून चरणारी त्यांची खिल्लारे
जन्म देवोत विपुल पाडसांना.
देवांच्या वरदानाने
लोकांची होवो समृद्धी सर्व क्षेत्रांत.
देवांच्या वेदीसमोर गावोत गायक श्रद्धापूर्वक
निरागस ओठांतून उठू दे आवाज
तंतुवाद्यांशी मिलाप साधून.

यंत्रणामंडळाचे आजीव सदस्य नजर राखोत
दूरदृष्टीने आणि विचारपूर्वक त्या शासकांवर
ज्यांची चालते सत्ता अवघ्या राज्यांवर.
तलवारी उगारल्या आम्याआम्यी आणि दुर्घटना घडण्याआधीच
यंत्रणा मंडळाने घ्यावी दाद.
नगरीतील परकीय अभ्यागतांच्या न्याय्य मागण्यांची
आणि करावी योग्य कार्यवाही झालेल्या करारांची.

स्वदेश रक्षिणाऱ्या देवांना सदाचा त्यांनी निरंतर मान
आपल्याच भूमीवर आपल्याच पूर्वजांपासून
शिकून घेतलेल्या धर्मविधींनी,
लॉरेलच्या शाखा धारण करून आणि
वृषभांचे बळी देऊन.
कारण मान राखला पाहिजे विना सबबी, त्या न्यायदेवतेच्या
कायद्यांमधे
मातापित्यांचा आदर करण्याच्या
कर्तव्याच्या कायद्याचा क्रमांक आहे तिसरा.

कॅनॅअस : प्रिय बाळांनो,
आजवरच्या मला तुम्ही केलेल्या मूक, श्रद्धापूर्ण प्रार्थना.
आता काय सांगतो ते ऐका–

नका भीतीने थरथरु ऐकताच माझ्याकडून

शरणार्थी

अनपेक्षित आणि अप्रिय अशी वार्ता,
शरणार्थ्यांच्या छावा आसनावरुन
माझ्या छावा टेहळणीच्या जागेवरुन
दिसते आहे मला एक जहाज !
त्या जहाजाची दोलकाठी, शिडे आणि
त्याच्या बाजूंना लावलेले कातळांचे पडदे –
निःसंशय आहे ते इजिप्तचेच जहाज.
पुढचा मार्ग निरखणाऱ्या दोळ्यांसह
सरकते आहे नाळ अगदी व्यवस्थित रीतीने
वरामावरील मार्गदर्शक सुकाणूच्या आशेत.
आम्हा धळींना अप्रिय भासणाऱ्या रीतीने.
अरे ! ती पहा ! दिसताहेत मला जहाजावर माणसे –
[illegible] दिसताहेत त्यांची काळी मस्तके त्यांच्या पांढऱ्या कपड्यांतून ,
आता आली इतर जहाजेही पूर्ण दृष्टीच्या–
आणि आता तर सगळाच जहाजांचा ताफा.
नेतृत्व करणारे जहाज
भूमीच्या अगदी समीप येऊन
मुंडाळून शिडे
येत आहे झपाट्याने किनाऱ्याकडे वल्ह्यांच्या मदतीने.
चला तर मग आणि हे बघा
तुम्ही यायला हवे धीरेपणाने, विचारपूर्वक;
[illegible] या आपल्या उमेदीच्या एकतीचेच फळ. या दिवशी
मी जातो मदतीसाठी, आणतो सैनिकांना
आमच्या अंतीम [illegible] समर्थनार्थ सुरक्षेसाठी.
[illegible] एवढा अमूल्य करता त्या माणसांचे जीवन
आणखी माणसांना समजून घेण्यावर करत असताना [illegible]
नका बाळगू त्यांची भीती.
तरीही लक्षात ठेवणे उत्तम की –
जर विलंब झाला आमच्या सैनिकांना
मदतीसाठी येण्यास तर ..
विसरु नका कधीही इथे मिळू शकणारे संरक्षण;

धीर धरा !
देवांना न जुमानणाऱ्या प्रत्येक पातक्याचा न्याय
करतील योग्य काळ आणि दिवस चुकलेल्यांचा दिवस.
तात, भयभीत झाले आहे मी !
किती वेगाने आली आहेत त्यांची जहाजे
आम्हाला पकडण्यासाठी
आता एका क्षणातच गाठतील ते आम्हाला
घरकाप उडाला आहे माझा भीतीने
घरापासून शतक्या दूरवर पळून आल्याने
काय झाला लाभ खरोखर ?
तात, बुद्धबुद्ध हरपतो आहे माझी !

डॅनॅअस: बाळे, आगरगॉसच्या लोकांनी
केले आहे शिक्कामोर्तब आपल्या ठाम निर्णयावर.
तर मग धर हिम्मत,
खात्री आहे मला लढतीलच ते तुमच्याखातर.

पहिला नारीवृंद : ईजिप्टसने पुर केले आहेत हिमाट, विवेकबुद्धीने
आणि विषयलालसेने हपापलेले आहेत लढाईसाठी.
मी सत्यच बोलते आहे ते तुम्ही चांगले जाणता.
त्यांच्या जहाजांचे लाकूड आहे भरभक्कम,
त्यांच्या नाळी आहेत चकाकत्या धातूच्या,
ते निघाले आहेत आमच्या शोधाला आणि
त्यांच्या पाठीशी आहेत हजारो कृष्णवर्णी गणसे.

डॅनॅअस: आणि त्यांना तोंड द्यावे लागेल.
बलशाली बाहूंच्या सडपातळ शरीरयष्टीच्या
हजारो सैनिकांशी—
ज्यांचे स्नायू झाले आहेत दणकट दुधारी उन्हे खाऊन.

पहिला नारीवृंद : तात, गुडघे टेकते तुमच्यासमोर,

नका सोडून जाऊ मला एकटीला.
कुठून असणार बाईमाणसाच्या अंगी धैर्य ?
काय करणार ही एकटी ?
आणि या माणसांना ठाऊक ही नाही विवेक,
ते आहेत गाभेफिक, पाखंडी—
उकिरड्यावरच्या अभक्ष्यावर
उपजीविका करणाऱ्या पक्ष्यांसारखे
त्यांनाही वेदीबद्दल नाही काही पूज्यभाव

द्वंद्वअज: बाळांनो, तुमच्या वैराचे सकारण लक्ष्य झालेले ते
जर झाले देवांच्या वैराचेही सकारण लक्ष्य,
तर आहे त्यात तुमचाच फायदा.

पहिला नारीवृंद : वाटते का तुम्हाला की
देवांच्या, त्रिशूळांच्या आणि यज्ञपात्रांच्या भीतीने
घेतील ते मागे आमच्यावर हल्ला करणारे हात ?
मी सांगते तुम्हाला नाही पळणार असे.
ते आहेत उद्धट, विषयासक्त,
उन्मादाच्या जोरात तत्काळ हात उगारणारे,
शिकारी कुत्र्यांसारखे निधड्या छातीचे
आणि देवांची कुचेष्टा करून
त्यांना निष्क्रिय बनवण्यात तत्पर असे.

द्वंद्वअज: अशी आहे लोकोक्ती की
'लाडक्यांना असते लाख शिव्यांची कुरणाच्या तिप्पीत'
[illegible]

पहिला नारीवृंद : त्यांची वृत्तीच आहे केवळ उन्मत्त, वेबंद पशूंची
रक्षण करायला हवे आम्हालाच आमचे—
चालणार नाही आता विलंब करून.

डॅनॅअस : वेळ लागतो जहाजांच्या तांड्यास
सागरपृष्ठी मार्गस्थ होण्यास
आणि समान वेळ लागतो किनाऱ्याजी स्थिर होण्यास.
नांगर टाकले तरीही करीत नाही कोणताही कप्तान
फाजील घाई
जहाजांच्या कुशीतील दोरखंडे किनाऱ्यावर आवळण्याची –
बंदर नसलेल्या किनाऱ्याला –
ते देखील रात्र पडत असताना–
वळवावे लागते जहाज अगदी काळजीपूर्वक –
मेंढपाळ मेंढरे वळवतो तसा.
मूर्खांत होऊन राहण्यापेक्षा कायमची कुशल सुकाणूगारकडी धावाधाव होता–
जसा काही प्रसववेदनांनी व्यथितच.
जहाचे व्यवस्थित नांगरली गेल्यावाचून सैन्याला
नाही उतरता येत सुरक्षितरीतीने किनाऱ्यावर.
म्हणून वाणा सूज्ञपणाने
आणि देवावर एकाग्रचित्त करून मिळवा त्यांचे साहाय्य.
मीही करीत विनवणी तुमच्यासाठी
आवाज वृद्ध असला तरीही असेल
शब्दांमधे यौवनाचा जोम.
करील प्रशंसा तुमच्या दूताची आरगॉसची जनता.

(डॅनॅअस जातो)

पहिला नारीवृंद : पर्वतमय प्रदेशा,
ज्याचे राजघराणे करते आहे आमचे रक्षण
आमचे आता होणार तरी काय ?
कुठे पळून जायचे आम्ही ?
कोठली अंधारी गुहा लपवून ठेवील आम्हाला ?
वाटते, श्यामल धुराप्रमाणे वर चढत जाता यावे
झ्यूसच्या तेजस्वी मेघांसन्निध.
नाहीतर अदृश्य बनून, पंखांशिवाय उड्डाण करीत

शरणार्थी

नाहीसे व्हावे– हरवून जावे धूलिकणांसारखे.
पण निरर्थक आहे पलायन,
यापुढे सुटका होणे नाही आगची !
थरथर कापते आहे माझे निराशेने काळवंडलेले
भयभीत हृदय.
माझ्या भित्त्याच्या मागावर असलेल्या शिकाऱ्याने
शेवटी गाठले माझेच सावज.
आहे मी अर्धमेली झाले भीतीने,
पत्करेल गला स्वीकारणे माझे भवितव्य
आवळलेल्या फासात.
पण नाही देणार मी माझे शरीर घृणास्पद पुरुषाला.
त्याआधीच कवटाळू दे मला मृत्यू.

जिथे [illegible] पाण्याही गेच हिम बनतात.
त्या निळ्या आकाशात मला आसरा मिळेल तर
किती छान होईल !
किंवा एखाद्या उंच निमुळत्या पर्वतशिखरावर
जिथे बकऱ्यांनाही चढता येत नाही त्या ठिकाणी
मिळावी जागा मला, दृष्टीच्या टप्प्यापलीकडील
एकाकी अशी.
गिधाडे जिथे भिरट्या घालतात असा
घेरी आणणारा कडा साक्षीला असावा,
मी खोल गर्तेत उडी घेताना
माझ्यावर लादलेले मला अंत.करण्यापासून नको असलेले
लग्न टाळण्यासाठी.
ताव मारतील मग माझ्या मृत शरीरावर रानटी कुत्रे,
पुष्ट होतील धरतीतील गिधाडे, त्यांचे समाधान होईल मला !
कारण मृतदेह असतो मुक्त
वेदना आणि अश्रू यांपासून.
मृत्यूने धराबा चांगला नेम
आणि ताब्यात घ्यावी आपली शिकार,

शय्या आणि आलिंगन यांचे मी भक्ष्य होण्यापूर्वी.
मुक्त होण्यासाठी कुठे धेऊ मी धाव ?
कुठे जाऊ मा शरीराचे बंधन झुगारून देण्यासाठी ?
स्वर्गाला भिडतील अशा उच्च स्वरात घाला हाक
करा प्रार्थना संकट मुक्तीसाठी–
समर्पण द्रव्येच आहेत ही–
देव देवींस तिकडे ध्यान आणि अनुकूल प्रतिसाद.
हे तात, झ्यूस देवा, पहा हा लढा.
न्याय वसतो तुझ्या दृष्टीने,
देऊ नकोस उत्तेजन हिंसाचाराला,
हे पृथ्वीच्या स्वामी, सर्वशक्तिमान झ्यूस देवा !
दया कर तुला शरण आलेल्या आम्हांवर;
ईजिप्टसचे पुत्र करताहेत आमचा पाठलाग;
धावताहेत आमच्या गाठण्यासाठी युद्धगर्जना करीत
पाठलाग करणाऱ्या पुरुषांच्या नेहमीच्या
पाशवी मगूरीने,
आम्हाला जबरदस्तीने पकडण्यासाठी.
झ्यूसदेवा, केवळ तुझ्याच हाती आहे
न्यायाच्या तराजूची दांडी;
तुझ्याशिवाय सिद्धीस जात नाही कोणतीही गोष्ट.

पहा पहा इकडेच येताहेत ते चाचे !
कशाला आलात तुम्ही किनाऱ्यावर ?
काय हवे आहे तुम्हाला ?
(ईजिप्तचा अगदूत अनेक सशस्त्र सैनिकांसह प्रवेश करतो)
धावा धावा ! आम्हाला हवी आहे मदत !
मदतीसाठी साद घालतो आहोत आम्ही !
हं ! आताच कुठे सुरुवात होते आहे,
नांदीच आहे ही आमच्या गुलामगिरीची –
आमच्या यातनांची !
(ईजिप्तचे सैनिक पुढे सरसावतात, त्यांच्यावर डॅनॉइसच्या कन्या

प्रतिमांकडे धाव घेतात)
वाचवा, वाचवा आम्हाला !
मदतीसाठी धाव घ्या देवांकडे
पेलॅसस राजा,
या क्रूरकर्मी आणि विकृती माणसांना शिक्षा कर नष्ट कर.
(मूर्ती पाहताच सैनिक प्रथम जरा थबकतात)

अग्रदूत : व्हा लवकर पुढे, चला जहाजांकडे,
चला, चला त्वरित चढा जहाजांवरती !
पाय उचला अगदी शक्य तेवढ्या वेगाने.
जर असे करण्याचे नाकारलेत तर–
शिक्षा उगून बसतू तुमच्या; भोसडू सैनिकांनी तुम्हाला
अगदी तुम्ही रक्ताने न्हाऊन निथळून निघेपर्यंत
जिकडे तिकडे रक्तच रक्त होईपर्यंत
मग उठ्यून टाकू गुंड्की तुमची.
चला, चला, महामारी पडो तुमच्यावर,
जाऊ द्यात तुमच्या धिंड्का जहाजांवर !

पहिला नारीवृंद : तुम्ही इकडे येत असतानाच
तुम्हाला आणि तुमच्या उन्मत्त जुलमी धन्यांना,
आणि तुमच्या क्रिटी पलिष्ट्यांनी बांधलेल्या जहाजांना,
माझ्या समुद्राच्या प्रचंड लोटाने भिरकावून दिले असते तर
किती छान झाले असते– अगदी माझ्या मनासारखे !
आणि मग राहिलो असतो आम्ही सुखात
राहिलो असतो सुरक्षित विटंबनेपासून.
विनवते तुम्हाला– सोडून द्या हिंसाचार,
सोडून द्या हे गाथेफिरूपणाचे कृत्य;
चला निघा, बाहेर व्हा या मंदिरामधून.
जा परत आपापल्या जहाजांवर,
आणि ठेवा मान आरगॉस नगरीचा.

पुन्हा कधीही दिसायला नको मला ती नाईल नदी–
तो भूमी सुपीक करणारा प्रवाह–
इजिप्तच्या लोकांच्या जोमदार धमन्यातील
उसळत्या रक्ताला पोसणारी नाईल नदी !
आम्ही आहोत आर्गाइव्हांच्या कुलातील –
एका प्राचीन वंशातील - प्रत्यक्ष राजकुलातील
एका राणीच्याच - वंशज आम्ही!

अग्रदूत : चालू दे चालू दे बडबड हवी तितकी!
पण चढावेच लागेल जहाजात तुम्हाला,
मग असो तुमची इच्छा किंवा नसो.

पहिला नारीवृंद : आरगॉसच्या नागरिकांनो,
धावा लवकर, चला या आगच्या मदतीला

अग्रदूत : तुम्हीच चला, आ पुढे, नाहीतर पस्तावाल -
जेव्हा अंगावर हात टाकून नेईन तुम्हाला फरफटत.

पहिल्या नारीवृंद : हया बाजूची मगुद्राच्या फरफटत
नेले जावो तुलाच आणि तुझ्या हया दुष्ट हातांना,
सिरिआच्या वादळाने न्यावे हाकलत तुम्हाला
वाळूसमग किनाऱ्यावर मार्मेडोन'च्या खडकाशी.

अग्रदूत : हं! चालू दे -
किंचाळा, ओरडा, आक्रोश करा देवांच्या नावाने.
इजिप्तच्या जहाजाशी असा घरसोडीचा खेळ
खेळता येणार नाही तुम्हाला.
चालू द्या आक्रोश करा आरडा ओरडा आणखी जोराने,
याहूनही आम्ल दयनीय सूर काढता येत नाहीत का तुम्हाला ?

पहिला नारीवृंद : (रडत,रडत) वृषाक्षांकित अशा सायप्रसच्या टोकाला

शरणार्थी

तुम्ही वळसा घालत असताना
गिळून टाकू दे तुम्हाला समुद्र
दुष्टपणा करण्यासाठी तुम्हाला इकडे पाठवणाऱ्या
अवरदस्त नाइलनदीकडून
नीच होवो तुमचा दुष्टपणा निष्फळ होऊन निमाल्यागत.

अग्रदूत : आमच्या जहाजांची नाळ फिरवलेली आहे समुद्राच्या दिशेला
पुन्हा सांगतो अधिकवेळ न गमावता चढा जहाजांवर
हिंज्या धरून फरफटत नेणे
हा काही खेळ नव्हे सौम्यपणात जमा होणारा.

पहिला नारीवृंद : तात, अहो तात,
मानवी स्वरूपातला हा सैतान
आपल्या भक्ष्यावर टपलेल्या कोळ्याप्रमाणे
आपले जाळे विणतो आहे मला पकडण्यासाठी
स्वप्नातल्यासारखा प्रकार आहे हा, हे पृथ्वी माते,
भूमीमाते ग, धाव मदतीला,
हे भूमाते, हे झ्यूसपित्या,
नाहीसे करून टाक हे भयंकर दुःस्वप्न!

अग्रदूत : मला नाही भीती वाटत तुमच्या ह्या देवांची
त्यांचे कसलेच ऋण लागत नाही मी--
ना जन्माचे ना जीवनक्रमाचे.

पहिला नारीवृंद : वाचवा, वाचवा मला
माझ्यावर चालून येणाऱ्या ह्या मानवरूपी घातक प्राण्यापासून
माझ्या पायाला विळखा घातलेल्या
ह्या शुष्क सापापासून.
पुरे हो अनाचारा! धाव सहाय्याला भूमाते! पृथ्वीमाते, धाव
वाचाय कर माझा ह्या भयंकर पशूच्यापकडीतून
अगे पृथ्वीमाते! धावरे तात झ्यूसदेवा!

अग्रदूत : तरुण सांगतो ते ऐका मुकाट्याने
आणि चढा बसू जहाजांवर.
नाहीतर माझ्यासारखा वाईट नाही कुणी!
फाडून फेकून टाकीन तुमची सलग ऐटबाज वस्त्रे.

हे आरगॉसच्या राज्यकर्त्यांनो आणि नेत्यांनो,
धावा मदतीला
पळवून नेताहेत बघा हे आम्हा सर्वांना!

पहिला नागरिकवृंद : मिळतील लवकरच तुम्हाला पुरेसे राज्यकर्ते,
चालवतील सत्ता तुमच्यावर इजिस्टसचे पुत्र !
मग हाकारणार नाही तुम्ही राज्यकर्त्यांना!
अगदी खात्री बाळगा!

अग्रदूत : हाय! पराभूत झालो आम्ही!
(इजिस्टसचे सैनिक ट्रोजनांच्या कब्जातून [illegible] एकापाठी एक [illegible] घेत असताना दिसू लागतो. ते बघून दुरवर असलेल्या ट्रोजनांच्या कळपा [illegible] धावतात.)

पहिला नागरिकवृंद : राजा रे!
पहा पहा. हे आम्हाला वेदीपाशून ओढून काढताहेत.

अग्रदूत : [illegible]
कारण माझे तिळमात्रसुद्धा ऐकून घेत नाही तुम्ही.

(पेलॅसस प्रवेश करतो)

राजा : कोण तुम्ही, काय चालले आहे?
पेलॅसिआच्या प्रजेला तिच्याच भूमीवर
न जुमानण्याचा काय हा उद्धटपणा?

तुम्हाला काय वाटते की
तुम्ही बायकांच्या देशात आला आहात?
आम्ही आहोत ग्रीसचे नागरिक,
[illegible] आमच्याशी सामना आम्ही आवरतो.
असे प्रमाद केलेत तर
कशीच भले व्हायचे नाही तुमचे
येईलच हे आवळून तुम्हाला.

अप्रजूत : प्रमाद?
असमर्थनीय अशी कोणती गोष्ट घडली माझ्याहातून?

राजा : प्रथम म्हणजे
शिकला नाही तुम्ही विदेशवासीयांनी कसे वागावे ते.

अप्रजूत : गैरवर्तन केले मी? ते कसे?
माझी हरवलेली वस्तु मला इथे सापडली म्हणून?

राजा : आपली बाजू पुढे मांडायला
[illegible] तुम्ही तिच्याशिवाय केलात का तुम्ही प्रवास?

अप्रजूत : श्रेष्ठ हर्मीज आहे माझा कैवारी प्रवासात
हरवलेल्या वस्तू सापडण्याच्या भाग्याचा
तोच आहे अधिष्ठाता देव.

राजा : हक्क सांगता तुम्ही देवांच्या मदतीवर,
आणि तरीही करता अतिक्रमण त्यांच्याच
पवित्र आलयांवर?

अप्रजूत : मी पूजते ते देव राहातात नाईलनदीच्या तीरावर.

राजा : आणि आमचे देव?

तुझ्या मते काहीच नाही का महत्व त्यांना?

अग्रदूत : पहातो कोण घेतो हिसकावून
हवा बायांना माझ्यापासून ते!

राजा : हात लावून तर पहा त्यांना,
तत्क्षणीच पावशील पश्चात्ताप त्यायद्दल.

अग्रदूत : तुझे शब्द करीत नाहीत विदेशवासीयाचे स्वागत.

राजा : स्वागताचा शब्द एकही नाही माझ्यापाशी
देवांच्या वेदीवर अत्याचार करणाऱ्यांसाठी.

अग्रदूत : इजिप्टसच्या पुत्रापर्यंत नेऊन पोचवीन मी
हे इत्संभूत वर्तमान.

राजा: तसे केलेस तरी नाही बाळणार किंचितही चिंता मला.

अग्रदूत : पण दूताने सांगायला हवी सगळी एकीकत
प्रत्येक मुद्दा स्पष्ट करुन--
म्हणून मलाही जास्त तपशीलवार माहिती पुरवायला हवी. तुम्ही
तर सांगा मला आधी विचारतो ते
माझ्या स्वामींनी मला पाठवले आणण्यासाठी
हवा स्त्रियांना - आपल्या चुलतबहिणींना.
तर मग कोणी मला भाग पाडले म्हणून सांगू
रिक्त हातांनी मागे परतायला?
अर्थात या बाबतीत आवश्यकता नाही म्हणा
न्यायालयाची वा साक्षीपुराव्याची.
न्याय देणारा आहे एरीज
तो निर्णय देतो अशा दाव्यात.
नुकसान भरपाई द्ध्याने करण्याचा नसतो त्याचा आदेश

तर तो करतो भरभक्कम दण्ड
ठार झालेल्या सैनिकांच्या आणि
रक्तबंबाळ मृत्यूच्या पंजात कळवळणाऱ्या अनाथांच्या रूपाने.

राजा : का म्हणून सांगावे मी माझे नाव तुला?
तुझ्या आणि तुझ्या मान्या सल्लागाना कळेलच ते योग्यवेळी.
या स्त्रियांच्या बाबतीत बोलायचे तर -
जर त्या झाल्या आपण होऊन तयार,
जर मालोपचाराच्या गोष्टीनी भिजवलीस त्यांनी समती
तरच घेऊन जावेस तू त्या सर्वांना.
मात्र या नगरीने ठरवले आहे भरगच्च सभेत एकमताने
की नाही करायचे त्यांना तुमच्या स्वाधीन
जबरदस्तीने वळी पडून.
हा त्यांचा ठराव अगदी अचल आहे -
जसा काही भक्कमपणे कायमचा खिळवलेला.
मी जे आता बोललो ते काही
कोरलेले नाही मेणावर.
किंवा ते चर्मपटावर लिहून त्याच्यावर नाही
केलेले शिक्कामोर्तब.
तू ऐकलेस ते आहे न्यायतत्त्वाधारे सरळ सत्यकथन.
नाहीसा हो त्वरित आता माझ्या नजरेपुढून.
करावी लागणारशी दिसते आम्हाला घनघोर लढाई
गिळो पुरुषांच्या पक्षाला विजय आणि सत्ता.

राजा: पाहशील तू - या भूमीचे पुत्रही आहेत पौरुषसंपन्न
आणि पोसले गेले आहेत ते
आंबवलेल्या जवाच्या मद्यमिश्रित पेयाहून
जास्त कडक अशा पेयावर.

(अग्रदूत आणि त्याचे सैनिक निघून जातात)
वार्यांनो, घावरु नका

चला सगळयाजणी - आपल्या सोबतिणीसह
वृध्दांनी आणि खुबीदार संरक्षणकर्त्यांनी
अभेद्य केलेल्या भक्कम तटाच्या आगच्या नगरीमधे.
(हे भाषण चालू असतानाच [illegible]
रंगमंचावर गोळा होतात.)
राखून ठेवले आहेत आम्ही निवास
सार्वजनिक आतिथ्यासाठी.
माझ्याही निवासाचा इतमाम काही कमी नाही
राहू शकता तुम्ही इतरांबरोबर
आरगॉसमधील प्रशस्त निवासांतून.
अथवा वाटल्यास राहा एकेकट्या वेगवेगळ्या घरात.
निवडा तुम्हास आवडेल ते सोयीचे घर,
मोल काहीच नाही पडणार तुम्हाला.
तुमचे येथील जीवनाधार म्हणून स्वीकारा
मला आणि माझ्या नागरिकांना.
आम्ही सर्वच संपूर्णपणे तयीस नेत आहोत
आमचा निश्चय अशाप्रकारे.
तुमचा कैवार घेण्यास कोणाला आहे आमच्याहून
अधिक अधिकार?

पहिला नारीवृंद : राजा पेलॅसस,
तुझ्या सत्कृत्यांचे पारितोषिक मिळो तुला.
[illegible]
आणि कृपा करून आमच्यावर, [illegible]
विश्वासाचे जणू केंद्रस्थान असे आमचे तात
डॅनॅअस यांना.
आमची काळजी वाहतील, करतील आमचा मार्गदर्शन ते.
आम्ही नव्हे तर त्यांनीच ठरवले पाहिजे आधी -
कुठे राहायचे आम्ही ते
आणि कुठले स्थान आमचे सुस्वागत करील ते.
भिन्न स्वराघाताने बोलणाऱ्या परदेशीयांकडे

शरणार्थी

लोक चटकन पाहतात दोष दृष्टीने.
सारे पार पडो सुरळीत-
आरगॉसवासीयांमधे आमच्या लोकिलाला न होवो स्पर्श
निंदा आणि तिरस्कार यांचा.

(राजा पेलॅस्गस शरीररक्षकांसह निघून जातो.)

परिचारकांनो तुमच्यामधील प्रत्येकीला
डॅनॅअसने दिली आहे, स्त्रीधनाचा भाग म्हणून
आपल्या प्रत्येक मुलीला, तिची सेवा करण्यासाठी.
राहा बघू सर्वजणी उभ्या आपापल्या गालकिणिजवळ.

(त्यांच्या नायकाचे स्वागतासाठी पुढे [illegible] पेलॅस्गस यांच्या परिचारिका त्यांच्याजवळ येऊन उभ्या राहतात. डॅनॅअस प्रवेश करतो आता त्याच्याही समवेत सशस्त्र सैनिक आहेत.)

डॅनॅअस : माझ्या बाळांनो,
आहुती देऊन, अर्घ्यप्रदान करून करा प्रार्थना
आरगॉसच्या नागरिकांनी -
जशी आलिम्पिआच्या देवतांची करतात तशीच.
त्या नागरिकांनीच मिळवला आहे निर्णायक जय
आपल्या ध्येयसिद्धीसाठी.
ह्या नगरीवर राज्य करणाऱ्या आपल्या मित्रांनी
ऐकली माझी विनवणी,
क्रोध आला त्यांना आमच्या भुलत बंधूंचा,
[illegible]
आणि माझे अधिकार आणि मानाचे स्थान
निश्चित करण्यासाठी
त्यांनी दिले आहे माझ्या दिमतीला
हे भालाईत शरीररक्षकांचे दल.

अशा या उपकारांनंतर आमच्या अंत:करणात
कृतज्ञतेने ध्याची मुख्य जागा मानाची - हे उचितच आहे.
आता हे लिहून ठेवा स्मृतिपटावर -
माझ्या अनेक उपदेशकांस मिळाला हा आणखी एक उपदेशक
कालांतराने कळतो अपरिचितांचा स्वभाव.
परक्यांविषयी बोलतांना इथले पाहुणचार विसरू नका.
सहज उच्चारलेल्या एका शब्दानेही होते
कायमची बदनामी.
दीडे वळवापेत लोकांनी असा सुंदर तारुण्यबहर
लाभला आहे तुम्हाला
म्हणून बनावनी मी नी दीड दे ६ नवीन माझी अडचण.
कठीण असते संरक्षण करणे
पक्वफळांनी भरगच्च अशा फलवाटिकेचे
अशा वाटिकेने चेतवले पुरुषांच्या धूर्ततेला
आणि बनवले त्यांना लालची
आणि मोह घातला शिवाय पदाघारी आणि
चतुष्पाद लुटारुंना तर
त्यात आश्चर्य ते काय?
घडते खरे अगदी असेच!
त्याच प्रमाणे जेव्हा मनाड उपवना डाकलेल्या फलवाटिकेत
लोभसपूर्ण यौवनाने मुसमुसलेले देह
दिसतात ॲफ्रॉडाइटला,
तेव्हा ती प्रसृत करते ते वर्तमान
परिणामी तियून जाणारा प्रत्येक पुरुष होतो
पर्युत्सुकतेने पीडित
आणि टावटवो हृदय विरघळवणारे कटाक्ष
अशा अनाघ्रात लावण्यावर.
विसरु नका तर मग. जे टाळण्यासाठी केला
खडतर प्रवास ओलांडीत भूमी आणि समुद्र
त्यालाच वळी पडू नये आम्ही.
आपणच आपल्या अब्रूला काळिमा फासून

शरणार्थी

सुरक्षितता कामा नये माझ्या शत्रूंना.
देऊ करताहेत ते तुम्हाला दोन निवासस्थाने
एक पेलॅस्गस देतो आहे आणि दुसरे नगरी
दोन्हीही मिळणार आहेत गोल दिल्याशिवाय
भाग्य मोठे आहे तुमचे!
मात्र माझ्या साऱ्या उपदेशापासून दूर नका गुळीही
आणि [illegible]

पहिला नारीवृंद : ऑलिम्पिआच्या देवांच्या कृपेने
उजळू दे भाग्य आमचे अन्य संबंधित बाबतीतही.
आणि तात, वाळगू नका खासगी गुळीही
माझ्या लावण्यमय कौमार्याबाबत.
अढळ आहे निर्धार माझा,
पूर्वीपासून निश्चित केलेला मार्ग.

या ग या, चला आरगॉसच्या द्वारापाशी
गाऊया स्तुतिस्तोत्रे
सर्व सत्ताधीश आनंदमय देवांची
नगरीवर राज्य करणाऱ्या
आणि एरॅसिनस[५]च्या अनादि प्रवाहानजीक
वास करणाऱ्या देवांची
आणि परिचारिकांनो,
तुम्हीही गाऊ लागा आमच्याबरोबर.

गाऊ या गीते आरगॉसची आणि पेलॅस्गसच्या प्रजेची,
नाही गायची यापुढे प्रार्थना
अनेक मुखांनी याहणाऱ्या नाइलच्या स्त्रोतांची.
ह्या तृषार्त भूमीला संततीची देणगी देण्यासाठी
आणि तिची मृत्तिका, संपन्न करणाऱ्या ओलाव्याने
मृदू करण्यासाठी,
आपल्या सौम्य जलराशी प्रसृत करणाऱ्या

नव्याची गीते गाऊ या आपण.
वळू दे पवित्र आर्टेमिसची दयार्द्रदृष्टी आमच्यावर
नको पडू दे लग्नबंधन आमच्यामधली
ॲफ्रॉडायटीच्या बळजबरीने.
माझ्या शत्रूंच्या पदरी पडू दे ते तसले इनाम!

परिचारिकावृंद: पण आमच्या विहित विधिगीतांनी
न विसरता केला जातो सन्मान ॲफ्रॉडायटीचाच.
झ्यूसच्या सिंहासनानंतर सत्ताधारित्वात
लागतो तिचाच क्रमांक, हीरासमवेत.
पण ही देवता आहे विविधरूपी आणि धूर्त
पूजिली जाते ही फक्त अतिगंभीर विधींनी -
ज्यात आपल्या प्रिय मातेशी सहभागी होऊन
प्रथम अवतरते अभिलाषा
आणि नंतर मार्दवयुक्त मनधरणी,
ज्यांच्या मोहजालांना कशहीही नसते दुष्प्राप्य.
दरम्यान संगीतदेवी आणि
कुजबुजत प्रेमाचे खेळ खेळणाऱ्या प्रीतिदेवता
यांना त्यांच्या भूमिका नेमून देते ॲफ्रॉडायटी.

पहिला नारीवृंद : तरीपण भीती वाटते मला अजूनही
त्या सैनिकांच्या दुर्दम्य हिंसकवृत्तीची,
त्यांच्या घोर निर्दयतेची,
ते देत असलेल्या रक्तपाती युद्धांच्या धमक्यांची
जलप्रवासाला वेग आणणाऱ्या वाऱ्याच्या गतीने
का कोणत्या ते इतके सज्जनी आमचा [illegible]?

परिचारिकावृंद: होईलच आता जे काही व्हायचे असेल ते
झ्यूसदेवाचा संकल्प म्हणजे एक दृढ दुर्गच!
[illegible]
[illegible]

शरणार्थी

स्त्रियांनी आजवर अनुभवलेल्या क्षुधार्तहून
कितीतरी अधिक: अशा.

पहिला नारीवृंद : सर्वशक्तिमान झ्यूसदेव करो माझे संरक्षण
इजिप्तसच्या पुत्रांशी होऊ घातलेल्या विवाहापासून.

परिचारिकावृंद : कोण जाणे, कदाचित अत्युत्तम ठरेल ती घटना.
पण अटळ घटना घडून नये असा दिसतो तुमचा हट्ट.

पहिला नारीवृंद : का म्हणतेस अटळ आहे ती घटना, म्हणून?
तुला ग काय ठाऊक भविष्यात काय होणार आहे ते?

परिचारिकावृंद : तेही खरेच म्हणा, मी तर पामर
कसा लागणार ठाव मला झ्यूसच्या अथांग मनाचा?
तरीही पाळा संयम तुमच्या प्रार्थनात.

पहिला नारीवृंद : कोणती पाळावी मर्यादा मी तुमच्या मतानुसार?

परिचारिकावृंद : देवांच्याबाबत कधीही नसावे दुराग्रही.

पहिला नारीवृंद : जगावर राज्य करणारा झ्यूसदेव
ज्या गाणसाचा तिरस्कार करतो मी
त्याच्या अदय गुलामगिरीपासून पाचवा मला
संजीवक हाताचे मार्दवपूर्ण सामर्थ्य वापरून
आयोला यातनामुक्त करून तिला पुनर्जीवन देणाऱ्या
झ्यूसदेव
मिळवून देवो विजय स्त्रियांच्या सत्यशाला.
बाईटातून निघेल जे काही चांगले ते स्वीकारीन मी
आणि जर चांगले बाईटातून अधिकांश ठरले,

जर माझ्या प्रार्थनेतून सुटकेचा मार्ग लाभला
आणि जर न्यायाच्या बाजूचा निर्णय झाला
तर त्यात वाटेल मला समाधान!

• • •

आवश्यक टीपा

१) **ईनियस** - ट्रोयमधला योद्धा, पळून जाताना त्याचा ट्रोयचा राजा प्रियमचा मुलगा भाऊ, पन्नास वर्षांचा तिसरा, आख्यायिकेचा राजा.

२) **ईनुहम** - ट्रोयमधल्या पन्नास कन्या प्रियमच्या पन्नास पुत्रांशी धुल्लग्न भावांशी लग्न केले व नंतर त्यांना पाणी ठार केले.

३) **पेलॉपोनीस:** ग्रीसच्या दक्षिणेकडील द्वीपकल्प.

४) **ट्रुय:** प्राचीन ग्रीकच्या कर्तव्यक्ष्य. (रामायण ट्रायडर)

५) **अपोलो:** सौन्दर्य,कला, प्रकाश, संगीत, सौंदर्य याचा अधिपती ग्रीक देव, ट्रुय व लेडा यांचा पुत्र.

६) **पॅमिडीस:** भूतां व भूमी सुरक्षित ठेवण्याचा मंत्र आणि अनेक मनुष्यांवर अधिसत्ता गाजवणारा ग्रीक देव. ट्रुयचा वंशू, हेक्टरचा देव. त्याला पांढरे बैल बळी दिले जात. त्रिशूल त्याची खूण.

७) **हर्मीज** देवांचा संदेशवाहू, व्यापार, धर्म, चोर, चोरी आणि हुशारी -सत्ता असलेला धूर्त देव.

८) **आरगॉस:** आग्नेय ग्रीसमधील एक प्राचीन नगर.

९) **सीरिआ:** पॅलेस्टिनचा उत्तर व वायव्य भाग.

१०) त्या कालच्या ट्रुयसमान वेगळेच - काल ही ट्रोयमधली कन्या, तिच्यावर ट्रुयचे ढग असले म्हणून तिच्याच वयाच्या मित्र मुलींचे रूप नाहीसे होऊन, त्यांचे ढग होत (ट्रुयची पन्ना कोणी कोणाची

[illegible] इफेनुसार आरगस (अलाप्या राज्य) याने तिच्याबरोबर पळून नेऊन. गोमांसीकडून तिचा पराभव करवला. गोमांसीच्या दबावामुळे पेलॉपिडी लोकांना ती पळून गुदली. इफेनुसच्या आदेशाने इजीप्तने आरगसवर हल्ला केले. ती दोघांनाही पोचली तेव्हा तिला एक तिला पकडू शिवाले आणि नाईल नदीच्या तीरावर तिने इजिप्त या इफेनुसला जन्म दिला.

१९) **डीरीअस** - डीरीअसने प्रोमीथी (प्रोमिथिअस) जेव्हा पर्वतावरून त्याला दोरीने हात बांधून झाला. डीरीअसने प्रोमीथीला दुरवस्थेत पोचून तिच्या बहिणींची - ओशिनिडांची रचना केले. ओशिनिडांची नौका घेऊन ताकदी मदती तिने काकासाठी तिच्या विरुद्ध लढण्यासाठी बोलावणे पाठविले. प्रोमिथिअसने डीरीअसचा त्याच्याच मुलाचे नाव सांगून घाबरले. डीरीअस कुठार पेक्षा त्या दोघी बहिणींचा पराभव करू, कामला तेव्हा देवाने त्याची प्रार्थना ऐकून त्याला समाप्त (डीरीअस) कुलकुल (प्रोमी) आणि पाताळी (हिल्लीनेस) अशी दूर दिली. प्रोमिथिअस आत्मा निर्वासित देवांकडून व आत्म्या घालून दुरवस्था पडल्याबद्दल शोकार्त गाणे गाते.

१२) **आयोनीआ:** आशिया माय्नरच्या पश्चिम किनाऱ्यावरील आणि ग्रीस व तुर्क सागरील भूमध्यसमुद्रातील (एजियन समुद्रातील) बेटावरील प्रदेश.

१३) **माईलसीने बनवलेल्या माझ्या गालांची** - ईर्लसच्या कन्या इजिप्शिअन असल्याने त्यांचा वर्ण श्यामल होता.

१४)**एपिआच्या:** आरगॉसचे एपिआ हे प्राचीन नाव.

१५) **हेलास** - हेलेनीज (ग्रीकचे ग्रीक) त्यांची भूमी ग्रीस.

१६) **सायर्डीस प्रांत** - मुख्य ग्रीक शहरांच्या सिलोनिअन असे आहे. हा प्रांत कातडीवरील सामानाबद्दल व इतर अनेक गोष्टींच्या व्यापाराबद्दल प्रसिद्ध आहे.

१७) **आगमेम्नन** - मिकीने देवता राजा. आर्टेमिसने शिक्षेसाठी अडवून त्याला मारले अशी एक मते. मृत्यूनंतर तो नाम झाला.

१८) **आर्टेमिस** - क्रूरकर्मा, शिकारीची व वनस्पतींची देवता अॅपॉलोची जुळी बहीण.

१९) **ऑलिम्पस** - देवांचे वास्तव्यस्थान मानले जाणारे ग्रीस आणि आशियामायनरमधील उंच पर्वत.

२०) **ऑलिंपियाच्या अधिष्ठात्या देवांच्या** - रथसंचालन शिकारीचे देव म्हणजे झ्यूस, अॅपोलो, पॉसिडोन, व हर्मीज व सर्व धार्मिक ऑलिंपियाशी संबंधित.

२१) **ओडिसि** - युलाच्या जिने महाकाव्य जी पराक्रमाचे.

२२) **राजा ओडिपस** - ग्रीसमधील प्राचीन लोकांचा राजा.

२३) **पेलियॉन** - पेलॅसगसचा पिता.

२४) **पेलिऑक्सस** - एक नदी.

२५) **पिण्डस** - मध्य ग्रीसमधील उंच पर्वतरांग.

२६) **पेऑनीस** - ग्रीसमधील एका पर्वतराजीचे नाव.

२७) **पेलोपोनीअस** - पेलोपा हे नाव ग्रीसमधील ज्यूसचे मंदिर देवतांचे एक ऑलिम्पियन स्थानक्षेत्र हे त्या प्रदेशाचे नाव पडले.

२८) **पेन्हीबीअस** - थेसलीतील एका प्रदेशाचे नाव.

२९) **एपिस** - आरगॉसचा राजा त्याच्या सन्मानार्थ एपिअन हे नाव पडले.

३०) गॉर्डियम - आजचे बेलन्दी. कोरिन्थजवळ गल्फमधील एक मोठे बंदर.

३१) सायप्रस - भूमध्यसमुद्रातील बेट.

३२) इथिओपिआ - ईशान्य आफ्रिकेचा इजिप्त व तांबडासमुद्र यांच्या हद्दीलगतचा प्राचीन प्रदेश.

३३) अॅगेमॉन - दूरची काळासमुद्राकडची व्यापारी पेठ किंवा राज्यात अशी समजुत होती. त्यांचे नाव.

३४) हीरा - ज्यूसची पत्नी व बहीण.

३५) आर्गस - शंभर डोळ्यांचा राक्षस, ज्याचे डोळे एकावेळी फक्त दोन मिटलेले असत. त्याला ठार केले. मेल्यानंतर त्याचे डोळे मोराच्या पिसांवर गेले.

३६) ईस्ट्रस - गोमाशी.

३७) कॅनोपस - अलेक्झांड्रियाच्या पूर्वेस सोळा मैलावर असलेले समुद्रतीरावरील शहर, पूर्वी ग्रीकांचे व्यापारकेंद्र.

३८) मेम्फीस - इजिप्तची पहिली पुरी राजधानी.

३९) एपॅफस - झ्यूस व आयो यांचा मुलगा, इजिप्तचा राजा. आपल्या आईला आपल्या पित्याची ओळखच होऊन हा क्रमशः मोठा झाला म्हणून त्याचे नाव एपॅफॉस म्हणजे स्पर्शोद्भव असे ठेवले.

४०) कोणती मुलगी तुझा दरवाजा - लग्नाच्या वेळचा प्रघात असे की वाग्दत्त मुलगी ही वर मुलाचे मालमत्ता बनते. परंतु लग्न झाल्यावर मात्र तिची परिस्थिती अधिक सुधारते. मुलीशी जो मालमत्ता भाडणे झाले तर तिच्या पतीशी राहणारे त्याचे संबंध उपयोगी पडतात. हा अर्थाच्या

विवाहापासून तोटा.

४१) थेमिस - प्रस्थापित व्यवस्था, रूढी, समाजीक न्याय यांची अधिष्ठात्री देवता.

४२) इनाकस - आरगॉसचा पहिला राजा. आयोचा पिता.

४३) अिजिया - सध्या ज्या भागास आपण मायसेनमधील प्रदेशाचे प्राचीन नाव. नंतर तो प्रदेश.

४४) मिसिअन - ज्यास आपण मायसेनमधील प्राचीन ट्रोइश मिसिअन तेथील लोक.

४५) टेलुफस - आर्गिव्हसचा पहिला अनेकदा हल्ला मारणारा मिसिअन राजा. त्याला शिक्षा म्हणून रोग झाला.

४६) मिसिसिआ - आपण आजचा मायसेनमधील प्रदेशाचे प्राचीन नाव. नंतर तो प्रदेश रोमनांचा झाला.

४७) अॅफ्रोडायटी - सौंदर्य व प्रीती यांची प्राचीन ग्रीकदेवता. (ही रोमनांमधे व्हीनस या नावाने ओळखली जाते)

४८) एरीज - प्राचीन ग्रीक युद्धदेव. क्रूर व हिंस यांचा पुत्र. (रोमनांमधे त्याचे नाव मार्स)

४९) नवजन्मयांवर शरसंधान - आर्टिमिसच्या बाणांमुळे स्त्रिया प्रसूतिकाळात मरतात असे मानले जाई.

५०) बायब्लस पळे - नेमका अर्थ लिहिला नाही. इथासारी बिब्लसची बोटे, असा अर्थ लक्षात घेऊन शब्दप्रयोग केला आहे.

५१) सार्पेदॉन - झ्यूस व युरोपा यांचा मुलगा, लिसियाचा राजा. मिनॉस व राडामंथस यांचा भाऊ. ट्रॉय युद्धात ट्रोजन बाजूने लढला. त्याचा मृत्यू पॅट्रोक्लसच्या हातून झाला.

५२) एरॅसिनस - नदी.

– समाप्त –

शृंखलाबद्ध प्रोमिथ्यूस

इस्कीलस कृत

अनुवाद

प्रभाकर उर्ध्वरेषे

शृंखलाबध्द प्रोमीथ्यूस

पात्रे :
शक्ती
हिंसाचार
हेफीस्टस (अग्नीदेव)
प्रोमीथ्यूस
गायिकावृंद (ओसिआनसच्या कन्या)
ओसिआनस (सागरदेव)
आइओ (आरगॉसची पुजारीण)
हर्मीज (झ्यूसचा दूत)

(रंगमंच : ओसाड सागर तट. उत्तरेकडे असा खडकाळ डोंगरमाथा)

शक्ती व हिंसाचार प्रवेश करतात. त्या प्रोमीथ्यूसला ओढून आणीत आहेत. त्यांच्या पाठोपाठ हेफीस्टस प्रवेश करतो.

शक्ती : येथे आपण येऊन पोचलो आहोत
पृथ्वीवरील एका अतिदूरच्या प्रदेशात,
हे आहे सिदियावासियांचे आश्रयस्थान नेहमीचे,
ओसाड माळ, नाही जिथे एकही ठसा पायलीचा.
हेफीस्टस, लाग तुझ्या कामाला.
कर स्मरण पित्याने तुला केलेल्या आज्ञेचे.
हा इथे आहे तो बंडखोर प्रोमीथ्यूस –
खिळे ठोकून जखड त्याला खडकाला.
खिळवून टाक त्याला त्या अत्युच्च शिखरावर
वज्रसदृश शृंखलांच्या भक्कम मगर मिठीत.
चोरला होता त्याने तुझाच अमोल निधी –
सर्व मनुष्यजातीला बहाल केलेल्या अग्नीचा तेजस्वी फुलोरा,

अन् देऊन टाकला तो मानवांना!
अक्षम्य अपराध ठरला तो देवांच्या लेखी,
आता शिक्षा भोगलीच पाहिजे त्याने त्या अपराधाची–
चांगला धडा शिकेपर्यंत – मान वाकवण्याचा
सार्वभौम सत्तेपुढे झ्यूसच्या.
आणि मानवांच्या हितासाठी मुक्तिचा मंत्र सांगणाऱ्या

हेफीस्टस : शक्ती आणि हिंसाचारा! तुम्हा दोघांपुरती तर
पूर्ती झाली झ्यूसच्या आज्ञेची.
तुम्ही झालात मुक्त. पण मी?
कसा टाकू मी हात गाठ्याच वंशाच्या एका देवावर,
कोठून आणू मी मनोबल
त्याला शृंखलाबद्ध करण्याचे,
या भीषण, उपद्व्यापोद्यक्या खडकाशी?
पण तरीही केलेच पाहिजे ते मला,
इच्छा असो वा नसो, ते मला केलेच पाहिजे.
झ्यूसच्या शब्दाची अवहेलना –
फार भयावह परिणाम होतील त्याचे.
(प्रोमीथ्यूसला उद्देशून)
तुझ्या मैत्रिच्या दुसऱ्या कोणाला कधी दिसतील रे!
व्यथित अन्तःकरणाने तुझ्याइतक्याच,
जखडणार आहे मी तुला क्रॉझच्या या सुदृढ बंधांनी
या ओसाड शिखरांशी –
जिथे कोणाचा आवाज नाही मुळी आणि कुणाचीही,
दिसणार नाही दृष्टीला आकार कुणा मानवाचा,
सारे सारे विसरून तुझे मुखाचे कमनीयत्व किरणांनी,
आनंदित होशील तू,
जेव्हा रात्र लपेटून टाकील दिवसाला
तिच्या तारांकित शबल वस्त्राने;
आणि पुनः अनुभवशील तोच आनंद,
जेव्हा पहाटेचे धुके विखरेल सूर्यकिरणांच्या उर्मीने.

तासामागून तास जातील,
व्याकुळ होईल शरीर वेदनांनी,
तासागणिक वाढणाऱ्या.
करू शकणार नाही मुक्त तुला,
कुणीही मानव आजवर जन्मलेला.
हे पारितोषिक मिळाले तुला
मानवजातीवरलच्या तुझ्या कनवाळूपणाचे.
देवयंशीय असून तू जुमानले नाहीस देवांच्या कोपाला,
उल्लंघन केलेस अधिकारस्थांचे;
दिलीस वरदाने तू मर्त्य मानवांना;
त्याचेच हे प्रायश्चित्त.
आता कर पहारा या भीषण खडकावर,
ताठ उभा राहून, न झोपता, न कलंडता विश्रांतीसाठी.
[illegible]
[illegible]
नवप्राप्त सत्ता अधीन असते पाषाणहृदयी.

शक्ती : [illegible]
सर्व देवांचा शत्रू अशा या देवार्थी –
तुलाच अधिकार ज्याने प्रदान केला मानवजातीला?

हेफीस्टस : विलक्षण चिवट असतात धागे
सहोदरत्वाच्या अन् सहजीवनाच्या अनुबंधांचे.

शक्ती : खरं आहे ते. पण म्हणून का अवज्ञा करणार
तू प्रत्यक्ष त्या पित्याच्या आदेशाची?
जास्तच भय वाटत नाही तुला त्याच्या परिणामाचे?

हेफीस्टस : मेहनीचीच आहे तुझी ही
निर्घृण, जुलमी आक्रमक वृत्ती.

शक्ती : व्यर्थ आहे तुझं हे सारं ढाकण त्याच्यासाठी; सोड नाद तो.
तू मदत करून शकणार नाहीस त्याला; नको दवडू वेळ उगीच
दुरवुरीत.

हेफीस्टस : वीट आलाय माझ्या व्यवसायाचा मला,
आणि माझ्या हातातल्या या कसबाचा.

शक्ती : कशाला करतोस राग त्याचा?
साधा सरळ विचार कर:
आता जे करणे भाग आहे
त्यात दोष नाही तुझ्या व्यवसायाचा.

हेफीस्टस : खरे आहे ते. पण किती बरे झाले असते,
हे माझे कसब दुसऱ्या कुणाच्या वाट्याला देते तर!

शक्ती : सगळीच कामे असतात भारभूत,
फक्त एक काम सोडून – देवांवर राज्य करण्याचे!
मुक्त असा एकच – फक्त झ्यूस!

हेफीस्टस : जाणतो मी ते. (प्रोमीथ्यूसचा निर्देश करीत)
हा सगळा आहे ना त्याचाच पुरावा – निर्विवाद!

शक्ती : त्वरा कर तर मग. इकडे बघ! ठोक त्याला बेड्या,
तुझी ढिलाई त्या पित्याच्या नजरेस पडण्यापूर्वी.

हेफीस्टस : ठीक! पहा तर मग!
या मनगटावरील लोहशृंखला आहे तयार!
(बेड्या ठाकठीक करू लागतो.)

शक्ती : हां! उचल त्या बेड्या. अडकवून टाक त्याला!
घाल घणाचे घाव सर्व शक्तीनिशी. खिळवून टाक त्याला खडकात.

हर्मीस्टस : हो! हो! करताय काय तो! हे, पहा, आता मला राजीनाम्याला सामोरं जायला लागणार नाही हा लोचंटी खिळा.

शक्ती : लोक! जाऊ दे आपली जात. पण असून हाक ऐकेना, किंवा हे नसे कोठे त्यात!

हर्मीस्टस : हा हात तर झाला पक्का. इकडून तरी निसटू शकणार नाही तो

शक्ती : दुसरा हातही लोक खिळ्याने पक्का. समजू दे त्याला,
की सगळे शहाणपण त्याचे
म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे ज्यूसपुढे.

हेफीस्टस : हं, झालं आता. मनसामध्ये काहू असणार नाही कोणी दोष या कामात
– अर्थात् तो स्वता - प्रोमीथ्यूस - सोडून!

शक्ती : आता घुसव सरळ त्याच्या छातीत –
तुझी सर्व शक्ती एकवटून –
त्या वज्रसमान पाचरीचा निर्दय जहरी घात.

हेफीस्टस : हाय! अजू ओरडली आहे मी त्या कूर शैलन पुन्हा केलानी, प्रोमीथ्यूस!

शक्ती : अजूनही कच खातोस? अजू आळशीसं ढकलल्या शकुनाही?
सांभाळ घर! नाहीतर कोप करशी त्यांचा तुझा बघ.शीघ्र!
(हेफीस्टस पाचर ठोकतो.)

हेफीस्टस : हं, हे झाले! पण बोलल्यासारखा नाही आता हे पुरुष!

शक्ती : मला दिसतं ते हे की
प्रोमीथ्यूस भोगतो आहे आपल्या कर्माचे पण योग्य प्रायश्चित्त
चल, बांध त्या श्रृंखला. त्याच्या फासळ्यांभोवती.

हेफीस्टस : [illegible]

शक्ती : हुकुम तर मी सोडणारच!
होय बरं, अगदी हात धुऊन
मागे लागशार तुझ्या तू काम चालू ठेवायचंस म्हणून.
हं! आता जरा खालचा भाग, घुसव त्याचे पाय या कड्यात.

हेफीस्टस : हे, तेवढे मात्र झाले झटपट!

शक्ती : आता पक्क्या ठोक या शृंखला. हं! घाल घाव जोरात!
कठोर आहे परीक्षक आपल्या या कामाचा.

हेफीस्टस : अन् आहे तूसुद्धा कठोर, तसाच आहे तुझा बाप जोमदार!

शक्ती : (उपरोधिकपणे) तर मग तू याग कनवाळूपणे पण मग
मी जर असलो कठोर आणि निष्ठुर,
तर टोमणे मारू नको मला त्याबद्दल.

हेफीस्टस : चला, बांधले पक्के त्याचे पाय. जाऊ या आता.
(हेफीस्टस निघून जातो.)

शक्ती : (प्रोमीथ्यूसला उद्देशून)
कर मुक्काम तिथे आता आणि फुगत जाऊ दे
तुझा उर्मट उद्दामपणा.
दे देवांचे अधिकार चोरून
त्या मर्त्य मानवांना!
कसे सोडता येणार आहे तुझे हे बंधन
तुझ्या त्या मर्त्य मानवांना?
तुझ्या नामकरणात झाली आहे गफलत, प्रोमीथ्यूस!
म्हणे "भावी घटनेआधी शहाणपण सुचणारा"!
तुझ्या अंगी नेमकी उणीव आहे ती शहाणपणाची–

जर तुझ्या मनात असेल विचार
या [illegible]
(शक्ती व हिंसाचार जातात.)

प्रॉमीथ्यूस : हे आकाशदेवते! हे वेगवान पंखांच्या वायूंनो!
आणि हे उसळणाऱ्या जलप्रवाहांनो!
हे सागरी लाटांच्या असीम हास्या!
हे जीवनदात्री पृथ्वीमाते!
तुम्हा सर्वांना हे माझे आवाहन!
आणि त्या सर्व साक्षी सूर्यबिंबालाही!
[illegible]
पहा केवढ्या अत्याचारी क्रौर्याने चालला आहे
माझा हा छळ, ही विटंबना.
सहन करायच्या आहेत मला या यातना
एक सहस्र वर्षे!
पहा हा लाजिरवाणा तुरुंग –
खास माझ्यासाठी निर्मिलेला,
त्या नव्या अधिपतीने देवांच्या!
कासावीस होऊन कण्हतो आहे मी
यातनांनी – आजच्या आणि आगामी!
कोठे दिसेल मला उदय पावताना
तारा तुझ्या मुक्तीचा?

काय म्हणतो आहे मी? मी तर यथातथ्य जाणतो
पुढे घडणारी प्रत्येक घटना;
पूर्वसूचित नाहीत अशा
कोणत्याच यातना नशिबी येणार नाहीत माझ्या.
नियतीने ललाटी लिहिलेले भोग
[illegible]
हे जाणून की व्यर्थ आहे प्रतिकार नियतीच्या सत्तेपुढे.

असल्या भयंकर यातनांनी पिळलेल्या गला
बोलवत नाही – तसेच गप्पही राहवत नाही.
मानवजातीला वरदाने दिल्याबद्दल
झालो आहे बंदिस्त या यातनांच्या खोऽयात.
कारण, मीच शोधून काढले अग्नीचे उगमस्थान
चोरला तो अग्नी, अन् केला बंदिस्त
फेनेल वृक्षाच्या शुष्क देठाच्या अंतर्भागात.
आणि हा अग्नी बनला मानवाचा गुरु
प्रत्यक्ष कलेच्या क्षेत्रात – मानवांचे महान् साधन.
[illegible]
पढवलेला!
आः! कोण आहे ते तिकडे?
कशाचा आवाज, कसला हा सुगंधित वायूचा स्रोत
माझ्या भोवती तरंगत आहे?
कोठून येतो आहे तो ते दिसत नाही मला.
देवाकडून, की मानवाकडून, की कोणा दैवताकडून?
तू या जगाच्या टोकाला,
या शिखरावर
माझ्या यातना पाहाण्याला आला आहेस की काय?
की दुसऱ्या कशासाठी?
पहा, पाहून ये मला. एक दुःखित, दुर्दैवी बंदी,
– एक देव, झ्यूसचा शत्रू,
रोष ओढवून घेतला आहे ज्याने,
झ्यूसच्या दरबारात नेहमी येणाऱ्या सर्व देवांचा,
झालो प्रमाणाबाहेर उत्तम मित्र मानवांचा म्हणून.
[illegible]
आणि ऐकू येते आहे वातावरणात कुजबुज
पंखांच्या हळुवार उपढझापीची!
आगमन कोणाचेही असो – भयप्रद भासते आहे ते!

शृंखलाबद्ध प्रोमीथ्यूस

(पंख कापलेल्या नीरेतून किंवा रथातून सागरकन्यांचा प्रवेश.)

सागरकन्यावृंद : मित्र नकोस. आम्ही सर्व सख्या आहोत तुझ्या.
[illegible]
आमच्या चित्तात नाचतोस तिच्यासारखा पेऊन निघाला आम्ही,
अन् आणले आम्हाला वायूनी येथे स्वरेने.
पोलादाच्या घणघण आवाजाचे प्रतिध्वनी
कंपने उठवीत आले आमच्या गुहेच्या पोलादी
[illegible]
अन् निघालो होतो तशाच अनवाणी
तडक आमच्या पंख लावलेल्या रथातून.

प्रोमीथ्यूस : अरेरे! हाय!! सुफला टेथिसच्या मुलींनो!
[illegible]
त्या ओसिआनसच्या कन्यांनो!
पहा– पहा माझी ही दशा.
पहा किती क्रूर बंधनात,
या दरीवरील सुळक्यांच्या शिखराला जखडून घेऊन
[illegible]

सागरकन्यावृंद : पाहातो आहे मी, प्रोमीथ्यूस!
अन् आलोय माझे डोळे पुसण्याची भरून आलेल्या मोठाने,
ओघळून जाताना पाहून या खडकावर
तुझी त्वचा – वज्रासारख्या [illegible]
जखडलेली.
एक नवा स्वामी सूत्रचालक बनला आहे ऑलिंपसचा,
हे नवे नियम आहेत खचित
त्या झ्यूसच्या नव्या जुलमी राजवटीचे;
नष्ट करतो आहे तो महान् शक्ती सगळ्या पुरातन.

प्रोमीथ्यूस : बरे झाले असते यापेक्षा जर
ह्यूसने मला खोल गाडून टाकले असते पृथ्वीच्या खाली,
मृतात्म्यांचे आश्रयस्थान असलेल्या हेडीजच्याही खाली,
टाटरिसच्या प्रचंड अवकाशात,
बंदिस्त करून क्रूर बेड्यांच्या अतूट बंधनात.
म्हणजे मग कोणीही देव, कोणताही अन्य प्राणी,
पाहू शकला नसता संतोष माझ्या यातना पाहून.
पण आता मात्र मी बनलो आहे
प्रत्येक वायुलहरीचे दयनीय क्रीडास्थान,
आणि माझ्या यातना देताहेत
माझ्या शत्रूंना समाधान.

सागरकन्यावृंद : इतका पाषाणहृदयी कोणता देव आहे
जो हर्षित होईल असले दृश्य पाहून?
कोण आहे असा जो मग तू जी नाही तुझ्या यातनांनी पूर्ण ह्यूस मोडून?
ह्यूस त्याचा कोण आहे दुर्दम्य अन् अचल.
युरेनसचा सारा वंश पायदळी तुडवतोय् तो,
शमणार नाही त्याचा क्रोध
त्याच्या उद्दीप्त भावनांची तृप्ती होईपर्यंत,
किंवा कोणी कपट-कारस्थान रचून
त्याचे अभेद्य सामर्थ्य त्याच्या हातातून हिसकावून घेईपर्यंत.

प्रोमीथ्यूस : शपथपूर्वक सांगतो तुला मी,
असलो जरी अशा अपमानित अवस्थेत,
हाती-पायी भक्कम बाद्यांनी बंधनात जखडलेला,
तरीही गरज पडणार आहे माझी त्याला,
त्या अमर देवांच्या अधिपतीला,
नियतीची नवी योजना उलगडून घेण्यासाठी,
कोण घेणार आहे त्याची सत्ता आणि वैभव हिरावून,
हे माझ्याकडून ऐकण्यासाठी.

मी भुलणार नाही
त्याच्या लाघवी जिव्हेतील गोड गोड मंत्रांनी,
विका दबणार नाही त्याच्या क्रूर धमक्यांनी,
अन् करणार नाही भेद या रहस्याचा,
जोवर करीत नाही तो मुक्तता माझी
या पाशवी बंधनातून,
आणि मान्य करीत नाही
या अत्याचाराची भरपाई करण्याचे.

सागरकन्यावृंद : किती उद्धट आहेस तू प्रोमीथ्यूस!
[illegible]
इतक्या यातना सोशीत असूनही!
पण फार स्वतंत्र वाण्याने बोलतो आहेस तू.
भयानक भीतीने कापतो आहे माझे हृदय
थरकाप होतो आहे माझा कल्पनेने तुझ्या भवितव्याच्या.
कसा काय होणार आहे अंत तुझ्या या संकटांचा?
आणि कसा पोचशील तू सुरक्षित विश्रांतीस्थानात?
कारण क्रोध असा आजवल्य आहे क्रोनसच्या पुत्राचा,
की कोणी समजावू शकणार नाही त्याला,
अन् कोणत्याही शब्दांनी द्रवणार नाही त्याचे अन्तःकरण.

प्रोमीथ्यूस : ह्यूस आहे अत्यंत निष्ठुर,
केवळ त्याची इच्छा हाच आहे त्याचा न्यायदंड,
— हे सर्व जाणतो मी.
[illegible]
जेव्हा खरी ठरेल माझी वाणी
आणि त्याचा नशा उतरेल.
मग अधेर त्याचा निर्घृण क्रोध शांत होईल,
अन् तो मैत्रीच्या करारासाठी हात पुढे करील,
आणि मीही त्याचे स्वागत करीन.

सागरकन्यावृंद : आता सांग सगळे काही नीट. समजावून सांग आम्हाला
कोणत्या अपराधासाठी बंदिस्त करण्यात तुला झ्यूसने,
आणि केली तुझी अशी अवहेलना अन् वागवले अशा क्रूरतेने.
सांग आम्हाला, पण त्या कथनाने तू संकटात सापडणार नसशील तर!

प्रोमीथ्यूस : यासंबंधी बोलावे तरी तापदायक,
पण स्तब्ध राहाणे हेही तितकेच क्लेशदायक!
काही केले तरी दुःखच येणार वाटयाला.

अगर देवांमध्ये प्रथम झाला जेव्हा क्रोधाचा स्फोट,
तेव्हा पडले त्यांचे दोन तट. एक उठला क्रोनॉसच्या विरुद्ध,
सत्ता त्याची उलथून पाडण्याला. अन् केला निर्धार
झ्यूसला राज्यपद देण्याचा, अन्-नीट ऐका हे–
अगदी निरंकुश राजा बनविण्याचा!
तितकाच उलट होता निर्धार विरुद्ध बाजूचा,
की होऊ देणार नाही कदापि झ्यूसला राजा देवांचा.
पुढे झालो मी सर्वोत्तम सल्ला देण्यासाठी तेव्हा –
प्रयत्न केला समजूत पटवण्याचा,
स्वर्ग आणि पृथ्वी यांचे पुत्र असलेल्या टायटनांचा,
पण सारे निष्फळ!
युक्तीचा धूर्त मार्ग त्यांनी शिडकारला, –
गर्व होता त्यांना आपल्या शक्तीचा,
आणीच खूपसाठ पातळी मनात की सहज मिळेल विजय,
अन् करू राज्य शक्तीच्या बळावर!
पण मला ज्ञात होते नियतीचे निर्धारित घडनाचक्र.
मातेने माझ्या – थेमिस किंवा पृथ्वी
(नावे विविध, पण व्यक्ती एकच),
– तिने वारंवार भविष्य वर्तविले होते मजपाशी.
ना पाशवी शक्तीने, ना हिंसेने,
युक्तीच्या धूर्त मार्गानेच मिळेल विजय भावी सत्ताधाऱ्यांना.

हे सगळे समजावून सांगितले मी त्यांना,
कारणेही दिली पटविण्यासाठी,
पण त्यांनी [illegible]
त्यांना.
मग सगोर होते त्यापैकी एकाने मार्गाचा केला मी स्वीकार
ठरविले की हेच सर्वात हितकर, संगतीने माझ्या मातेच्या
की [illegible]
मीच सुचवला तो मार्ग, परिणामी ज्याच्या
वृद्ध क्रोनॉस अन् सारथी त्याचे
[illegible]
अशी केली मी मदत त्या देवांच्या राजाला
अन् हे त्याचे मला मिळालेले पारितोषिक.
त्याची का ही [illegible]
स्वाभाविकच असावी सर्वच निरंकुश सत्ताधाऱ्यांच्या अंतरी.

[illegible]
ज्यासाठी हा छळ मांडला आहे झ्यूसने माझा?
सांगतो या प्रश्नाचे उत्तर – ऐक.
होताच आरूढ पित्यानंतर त्याच्या सिंहासनावर,
[illegible]
दिले नेमून ज्याचे त्याचे निवासस्थान आणि प्रभुत्वक्षेत्र.
शुद्ध मानवांची नव्हती त्याला दखल,
[illegible]
असा होता त्याचा निर्धार.
निर्धाराला या त्याच्या, करीना कोणी विरोध,
मीच निभालो एकटा.
मीच दिले आव्हान. मीच वाचवले मानववंशाला
पार शुळीस मिळण्यापासून, संपूर्ण संहारापासून.
त्या साठीच भोगतो आहे या दारुण यातना,
[illegible]
करुणा आली मला मर्त्य मानवांची,

पण मी स्वत: मात्र ठरलो नाही करूणेस पात्र;
म्हणून मिळाले हे कठोर शासन मला
कलंकित करणारे आहे हे दृश्य झ्यूसच्या नावाला.

सागरकन्यावृंद : हृदय अनेक आवेगांचे, अन् पुन्हा उचंबळून येणारे.
तरच पाहिजे पूर्णपणे नाही तुम्हा ही यातना पाहून, प्रोमीथ्यूस!
मला ही वस्तुस्थिती प्रथमच माहीत असती
तर मला कधीच पाहावेसे वाटले नसते हे दृश्य;
आता ते पाहिल्यावर माझे विदीर्ण होत आहे माझे हृदय.
दु:खाने अन् क्रोधाने!

प्रोमीथ्यूस : माझ्या मित्रांना करूणा येते खरीच ही माझी दशा पाहून.

सागरकन्यावृंद : तू सांगतोस तसेच घडले असणार? काही आणखी तर नाही ना?

प्रोमीथ्यूस : हो, आणखी एक केले मी.
आपले मरण मानवांना आधी कळू नये
अशी योजना केली मी.

सागरकन्यावृंद : त्यांच्या दु:खहरणासाठी कोणता उपाय शोधून काढलास तू?

प्रोमीथ्यूस : आंधळा आशावाद – त्याचे पक्के
बीजारोपण केले मी त्यांच्या हृदयात.

सागरकन्यावृंद : ही तुझी देणगी म्हणजे त्यांना मोठेच बरदान प्राप्त झाले
म्हणावयाचे!

प्रोमीथ्यूस : याहूनही आणखी एक मोठी गोष्ट केली मी:
मी दिली भेट त्यांना अग्नीची.

सागरकन्यावृंद : काय? त्या मानवांना – ज्यांचे जीवन केवळ एक दिसाचे –

झाली प्रादी त्यांना अग्नीच्या प्रखर तेजाची?

प्रोमीथ्यूस : होय, खरे आहे ते. आणि आता नाना कला
साध्य करून घेतील ते त्याच्या साहाय्याने.

सागरकन्यावृंद : हा होता तर तुझा अपराध,
त्यासाठी येथे या यातना भोगतो आहेस तू –

प्रोमीथ्यूस : हो! निर्दय झ्यूसने क्रूरपणे लादलेल्या यातना.

सागरकन्यावृंद : आणि या यातनांचा अंत नाही तुझ्या नशिबात लिहिलेला?

प्रोमीथ्यूस : नाही ना, योग्य वेळ येईपर्यंत – त्याच्या मर्जीनुसार – तरी नाहीच.

सागरकन्यावृंद : त्याला कधीच वाटणार नाही अंत करावा असा.
तर मग आशेला जागाच नाही? खरंच, चुकलंच तुझं –
तुला पण नाही असं वाटत? 'चुकले तुझं'
असं म्हणताना मी होते व्यथित,
अन् तुलाही होतात वेदना.
तर मग नकोच आता या विषयाबद्दल अधिक काही बोलणं.
त्याऐवजी पाहू या सापडतो का
काही मार्ग तुझ्या मुक्ततेचा.

प्रोमीथ्यूस : हूं! सोपे आहे उपदेश करणे
यातना भोगणाऱ्याला,
यातनामय तुरुंगाच्या भिंतीबाहेर जो राहून.
जे जे म्हणालीस तू मला उद्देशून,
जाणतो मी ते सगळे फार पूर्वीपासून.
माझी चूक? मान्य! मान्य करतो मी तो शब्द. पण अगदी
बुद्धिपुरस्सरच केली मी ती चूक!

आणि करीत असता साहाय्य मानवांना,
ओढवून घेतले मी संकट स्वतःवर.
पण तरीही अपेक्षिली नव्हती मी शिक्षा इतकी भयंकर –
एका ओसाड, निर्जन शिखरावर, अधांतरी लोंबकळत,
खडकाच्या गगरभिठीत कुजण्याची, सडण्याची!
ऐका! यांचवा हा आक्रोश माझ्या सध्याच्या वेदनांसाठी
चालविलेला.
उतरा याही धरतीवर, माझ्या भोग्यात [illegible]
